दैनिक www.esuryodaylive.com
महाराष्ट्र
# सूर्योदय
Email : suryodaykokan.123@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)
निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक),नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

24 तास सेवा ॥ श्री नागनाथ कृपा ॥ प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121
सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स
CHEMIST & DRUGIST
शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल
सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील
मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

पुणे ॥ वर्ष ६ वे ॥ अंक १६७ ॥ रविवार १४ जून २०२६ ॥ RNI No.MAHMAR/2014/54581 ॥ Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 ॥ पाने ४ किंमत २ रुपये ॥

## राज्यातील ११६ दुय्यम कारागृहांना कायमचे टाळे; महसूल विभागाचा निर्णय

मुंबई : राज्यातील सर्वच्या सर्व ११६ दुय्यम कारागृहांना कायमस्वरूपी टाळे लावण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. २० ते १०० कैद्यांची क्षमता असलेली या कारागृहांची दुरवस्था झाल्याने तसेच यातील ८० कारागृहे बंदच असल्याने ही कारागृहे दुरुस्त न करता कायमस्वरूपी बंद करण्यात येणार आहेत. महसूल विभागाने शुक्रवारी या संदर्भातील शासन निर्णय जारी केला.



राज्यभरातील दुय्यम कारागृहांची सद्यःस्थिती आणि त्यांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी गृह विभागाने १७ ऑक्टोबर २०२३ रोजी एका विशेष अभ्यासगटाची स्थापना केली. या अभ्यासगटाने १० डिसेंबर २०२४ रोजी आपला अंतिम अहवाल सरकारला सादर केला. या अहवालावर महसूल आणि गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांची संयुक्त बैठक झाली. या बैठकीनंतर ही कार्यालये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे ब्रिटिश काळापासून चालत आलेली आणि स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ अस्तित्वात असलेली दुय्यम तुरुंग नियमपुस्तिका, १९५२ इतिहासजमा झाली आहे.

सध्या राज्यातील एकूण ११६ दुय्यम कारागृहांपैकी तब्बल ८० कारागृहे आधीच बंद अवस्थेत पडलेली आहेत तर उर्वरित ३६ कारागृहे तांत्रिकदृष्ट्या कार्यरत असली तरी ती सुस्थितीत नाहीत. या दुय्यम कारागृहांमध्ये सद्यस्थितीत दाखल असलेल्या कैद्यांना संबंधित जिल्ह्यातील जिल्हा कारागृह किंवा मध्यवर्ती कारागृहांमध्ये तातडीने रवानगी करण्याची जबाबदारी गृह (तुरुंग) विभागाकडे देण्यात आली आहे.

राज्यातील ११६ दुय्यम कारागृहांना कायमचे टाळे; महसूल विभागाचा निर्णय

सरकारी जमिनींवर गवत लागवड; बचत गट, माविमसह बेरोजगार संस्थांशी भाडेकरार, मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री बावनकुळे यांची महत्त्वाकांक्षी योजना

पदे वर्ग करणार

दुय्यम कारागृहांसाठी गृह विभागाची लिपिक संवर्गातील (वर्ग-३) एकूण ६ पदे मंजूर होती. ही पदे श्रीरामपूर (अहिल्यानगर), महाड (रायगड), मालेगाव (नाशिक), तळोदा (नंदुरबार), कराड (सातारा) आणि उदगीर (लातूर) या ठिकाणी मंजूर असून सद्यस्थितीत ती रिक्त आहेत. आता ही सर्व रिक्त पदे संबंधित कारागृह उपमहानिरीक्षक कार्यालयाकडे वर्ग करण्याचे आदेश गृह विभागाला देण्यात आले आहेत.

आर्थिक तरतूद बंद

दुय्यम कारागृहांचे दैनंदिन व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांचे वेतन, दूरध्वनी, वीज आणि पाणी शुल्क, कंत्राटी सेवा, आहार खर्च तसेच कार्यालयीन खर्चासाठी गृह विभागामार्फत विशेष अर्थसंकल्पीय तरतूद केली जात होती. आता ही कारागृहे बंद झाल्यामुळे पुढील आर्थिक वर्षांपासून निधीची तरतूद बंद केली जाणार आहे.

## पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीसाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करा

मुंबई, पावसाळ्यात संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचे नियोजन करताना रेल्वे, महापालिका, बेस्ट आणि, जिल्हाधिकारी कार्यालये, मेट्रो आणि अन्य प्राधिकरणे यांनी सर्वसमावेशक आराखडा तयार करुन समन्वयाने काम करण्याच्या सूचना मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिल्या.



मुंबईतील रेल्वेच्या हद्दीत येणाऱ्या नालेसफाईच्या कामाचा व मान्सूनपूर्व कामाचा आढावा घेण्यासाठी मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. शेलार यांनी पश्चिम रेल्वेच्या मुख्यालयात समन्वय बैठक घेतली. या बैठकीला मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे, मध्य रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक हिरेश मीणा, पश्चिम रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक पंकज सिंग यांच्यासह मुंबई शहर आणि उपनगराचे जिल्हाधिकारी, महापालिका, रेल्वे, फायर ब्रिगेडचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले की, दुर्दैवाने पूर परिस्थिती निर्माण झाली तर ज्या रेल्वे स्टेशनवर गर्दी होईल अशा रेल्वे स्टेशनमधून गर्दी बाहेर काढणे, बाहेरच्या रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करणे, प्रवाशांना पाणी, अन्नपदार्थ देणे या एकूण परिस्थितीचा सर्वसमावेशक आराखडा तयार करा. तसेच दोन्ही प्राधिकरणाच्या सीसीटीव्ही आणि सूचना देणारी यंत्रणा, आपत्कालीन कक्ष यामध्ये समन्वय ठेवा. रेल्वे स्टेशनमधील आणि बाहेरील पादचारी पूल, वाहतुकीचे पूल, रेल्वे स्टेशन परिसरातील होर्डिंग या सगळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करा. रेल्वे आणि महापालिका यांचे पंप यांचाही सर्वसमावेशक आराखड्यात सुव्यवस्थित समावेश करण्याच्या सूचना मंत्री शेलार यांनी केल्या. तसेच मस्जिद बंदर आणि परिसरातील रेल्वे हद्दीत येणाऱ्या व धोकादायक ठरलेल्या २४ इमारती आणि काही झोपड्या यांचे पुनर्वसन व तेथील रहिवासी याबाबत सविस्तर अहवाल तयार करुन शासनाकडे पाठविण्याच्या सूचनाही मंत्री ॲड. शेलार यांनी केल्या.

पश्चिम रेल्वेने सांगितले की, पाण्याचा निचरा करण्यासाठी चर्चगेट ते विरारदरम्यान एकूण १५ मायक्रो टनेल रेल्वे ट्रॅक खालून करण्यात आले असून या वर्षात ४ मायक्रो टनेल पूर्ण करण्यात आले आहेत. तर पाणी उपसण्यासाठी पंपांची संख्या वाढवून यावेळी १२६ पंप बसवण्यात आले आहेत. २४०० वॅगन गाळ काढण्यात आला आहे. मध्य रेल्वे मार्गावरही पंपाची संख्या वाढवण्यात आली असून २२० पंप बसवण्यात आले आहेत. ३५० किलोमीटर लांबीच्या मार्गावरील १६० नाले व गटारांची सफाई करण्यात आली आहे. दोन्ही मार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे आणि पर्जन्यमापक बसवण्यात आले आहेत. यावेळी कांजूरमार्ग येथील उषानगर नाला आणि कुर्ला येथील ब्राह्मणवाडी नाल्याच्या खोलीकरण आणि रुंदीकरणाची कामे करण्यात आल्याने पाण्याचा निचरा वेगाने होऊ शकेल.

दरम्यान, दोन्ही रेल्वेचे सादरीकरण झाल्यानंतर मुंबई महापालिका आणि फायर ब्रिगेडने त्यांच्या काही सूचनाही केल्या. रेल्वे आणि महापालिका यामध्ये पूर्वीपेक्षा आता अधिक चांगल्या प्रकारे समन्वय होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## आमच्याशी कुणीही संपर्क केलेला नाही

नागपूर : राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार गट) नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी आज नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राज्यातील राजकीय आणि देशातील सामाजिक प्रश्नांवर स्पष्ट भूमिका मांडली.




सध्याच्या राजकीय वातावरणात सुरू असलेल्या 'विलीनीकरण' आणि 'पक्ष फोडण्याच्या' चर्चांवर सुप्रिया सुळे यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. त्या म्हणाल्या, आपापसात तू-तू, मै-मै करून घर फोडा आणि पक्ष फोडा, असे उद्योग आम्ही कधी केले नाहीत आणि भविष्यातही करणार नाही. सध्याची वेळ ही राजकारण करण्याची नसून, देश वाचविण्याची आहे. देशात महागाई, बेरोजगारी आणि प्रचंड भ्रष्टाचार सुरू असताना अशा फुटीच्या राजकारणात वेळ घालवणे चुकीचे आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, नीट परीक्षेसारख्या गंभीर विषयावर मुलांचे भविष्य सुरक्षित करण्याऐवजी आपापसात वाद करणे ही दुर्दैवी बाब आहे. संकटकाळात जनतेला आधार देण्याची आमची जबाबदारी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. तसेच, देशाची आर्थिक परिस्थिती चिंताजनक असून, पंतप्रधानांनी सर्वपक्षीय बैठक बोलावून त्यावर सविस्तर चर्चा करावी, अशी विनंती वारंवार करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे त्या म्हणाल्या.

आमदार-मंत्री भेटीचा राजकीय अर्थ काढू नका

राजकीय वर्तुळात रंगलेल्या आमदार आणि मंत्र्यांच्या भेटीगाठींच्या चर्चेवर सुळे यांनी स्पष्टीकरण दिले. त्या म्हणाल्या, मी स्वत: दर आठवड्याला विविध मंत्र्यांना कामासाठी भेटत असते. काल मी विनोद तावडे यांची भेट घेतली, ती केवळ कामासाठी होती. कोणत्याही राजकीय पक्षातील लोक कामासाठी एकमेकांना भेटत असतात, त्याचा राजकीय अर्थ काढणे चुकीचे आहे. आमच्या पक्षातील कोणत्याही आमदार किंवा खासदारांशी भाजपने संपर्क साधलेला नाही.

## महाराष्ट्रात मान्सूनची संथ वाटचाल

मुंबई : राज्यातील शेतकरी, नागरिक आणि प्रशासन सध्या मान्सूनच्या पुढील वाटचालीकडे लक्ष ठेवून आहेत. यंदा जून महिना अर्ध्यावर आला असला तरी राज्यातील अनेक भागांमध्ये मान्सूनची अपेक्षित प्रगती झालेली दिसत नाही. काही ठिकाणी पूर्वमोसमी सरी आणि वादळी पाऊस होत असला तरी व्यापक स्वरूपाचा मान्सून अद्याप सक्रिय झालेला नाही. त्यामुळे शेतीसह विविध क्षेत्रांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत मान्सूनचा वेग मंदावलेला आहे. विशेषत: राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाची प्रतीक्षा कायम असून नागरिकांना उष्णता आणि दमट वातावरणाचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये मान्सूनने पुढे सरकत पावसाची हजेरी लावली आहे. आसाम, मेघालय, नागालँड आणि अरुणाचल प्रदेशमध्ये पावसाच्या हालचाली दिसून येत आहेत.

महाराष्ट्रासाठी मात्र पुढील काही दिवस महत्त्वाचे ठरणार आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १८ जून ते २५ जून या कालावधीत मुंबई आणि कोकण किनारपट्टी परिसरात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळे तापमानात काही प्रमाणात घट होण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर २५ जून ते २ जुलै या आठवड्यात राज्यातील अनेक भागांत सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या काळात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता असल्याने प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मात्र, हवामान खात्याने दिलेल्या अंदाजात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला आहे. २ जुलै ते ९ जुलै या कालावधीत पावसाचे प्रमाण पुन्हा कमी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे जूनअखेरीस जोरदार पाऊस झाल्यानंतर जुलैच्या सुरुवातीला काही भागांमध्ये पावसाचा खंड पडू शकतो.

दरम्यान, शनिवारी राज्यातील काही जिल्ह्यांना वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून येथे ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्यासह जोरदार पावसाची शक्यता आहे. याशिवाय नाशिक आणि वर्धा जिल्ह्यांनाही ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

रायगड, सिंधुदुर्ग, सांगली, सोलापूर, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव, भंडारा, गडचिरोली आणि गोंदिया या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

दुसरीकडे, राज्यातील काही भागांमध्ये उष्णतेचाही प्रभाव कायम आहे. वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी उष्णतेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून अकोला आणि अमरावती जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## तेलबिया व कडधान्य प्रक्रिया उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान; तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, : विभागातील तेलबिया व कडधान्य पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करण्यासाठी तसेच स्थानिक पातळीवर मूल्यवर्धनाला चालना देण्यासाठी कृषी विभागामार्फत केंद्र व राज्य शासनाच्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान आणि कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६-२७ अंतर्गत विविध प्रक्रिया युनिट्स व गोदामांसाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून सबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज मागविण्यात आले आहेत.

योजनेअंतर्गत २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी अंदाजित खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. तसेच १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढणी युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल १९.९० लाख रुपये अनुदान मिळणार आहे.

मिनी ऑईल मिल (फिल्टर प्रेससह) या घटकासाठी किमतीच्या ४० ते ५० टक्के किंवा कमाल ४ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल.मिनी ऑईल मिल (फिल्टर प्रेस शिवाय ) या घटकासाठी किमतीच्या ४० ते ५० टक्के किंवा कमाल ३ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल. याशिवाय कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट (किमान क्षमता ३०० किलो प्रतितास) स्थापनेसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे.

संपादकीय

## सामूहिक शेती गरजेची

ग्रामीण भागातील वाढते स्थलांतर, शेतीकडे होणारे दुर्लक्ष आणि ओसाड पडणाऱ्या सुपीक जमिनी ही चिंतेची बाब बनली आहे. अशा परिस्थितीत गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिक शेतीचा मार्ग स्वीकारल्यास उत्पादन, उत्पन्न आणि रोजगाराच्या संधी वाढू शकतात. सामूहिक शेती ही केवळ शेतीची पद्धत नसून गावाच्या शाश्वत विकासाचा प्रभावी पाया ठरू शकते.मी माझ्या आयनल गावच्या प्राथमिक शाळेत शिकत असताना पांडुरंग साटम, विजय साटम, दशरथ दहिबावकर आणि शांताराम दहिबावकर यांच्या जमिनीवर सामूहिक पद्धतीने भातशेती केली जात असे. त्या काळात गावातील लोक एकमेकांना सहकार्य करत शेतीची सर्व कामे मिळून करायचे. त्यामुळे वर्षभर पुरेल इतके भात उत्पादन होत असे. मेहनतीमुळे तांदळाचे चार निर्मळ गोठे भरत आणि कुटुंबांची अन्नाची गरज सहज भागत असे. गावात एकोप्याचे वातावरण असल्याने शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून सामाजिक बांधिलकीचे प्रतीक होती. मात्र आज परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदललेली दिसते. अनेक शेतजमिनींवर काजू व आंब्याच्या बागा उभ्या राहिल्या आहेत, तर काही सुपीक जमीन ओसाड पडलेली दिसते. यामागे पावसाचा अनियमितपणा, मुलांचे शिक्षण, आरोग्य सुविधा आणि रोजगाराच्या शोधात होणारे स्थलांतर ही प्रमुख कारणे आहेत. अनेक कुटुंबे शहरांकडे वळल्याने गावातील घरे वर्षातील बहुतांश काळ बंद असतात.

परिणामी शेतीकडे दुर्लक्ष होत असून रानांची निगा राखली जात नाही. याचा परिणाम म्हणून माकडे, गवारेडे आणि बिबटे यांसारखे वन्यप्राणी लोकवस्तीत येऊ लागले आहेत. विशेषतः माकडांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. काही ठिकाणी बंद घरांची कौले काढून माकडे घरात वास्तव्य करत असल्याचे चित्र दिसते. या अडचणींमुळे अनेक शेतकरी शेती सोडून शहरात नोकरी करण्यास प्राधान्य देत आहेत. एकेकाळी हिरवेगार दिसणारे वाफे आणि सडे आज विद्रूप अवस्थेत दिसतात.

अशा परिस्थितीत गावाच्या विकासासाठी सामूहिक शेती हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. गावातील शेतकऱ्यांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक आहे. सामूहिक शेतीमध्ये अनेक शेतकरी मिळून शेती करतात आणि उत्पादनाचे समप्रमाणात वाटप करतात किंवा जमीन मालकाला ठरलेला हिस्सा देऊन उर्वरित उत्पादन वाटून घेतात. आजही शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. पावसाने दडी मारल्यास शेतकऱ्यांचे मनोधैर्य खचते. मात्र सामूहिक शेतीमध्ये एकमेकांचा आधार मिळत असल्याने संकटांचा सामना करणे सोपे जाते. कामांची विभागणी झाल्याने श्रम कमी होतात, उत्पादन वाढते आणि नफा-तोट्यात सर्वांचा समान सहभाग राहतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशा पद्धतीमुळे गावातील सामाजिक ऐक्य, परस्पर विश्वास आणि नातेसंबंध अधिक दृढ होतात. सामूहिक शेतीमुळे गावातील अल्प व मध्यमभूधारक शेतकऱ्यांना फायदेशीर ठरते. याचा परिणाम त्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते. उत्पन्न वाढल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारल्याने ते आपला विकास करू शकतात. जर गावातील शेतकऱ्यांचा एकत्रितरीत्या अभ्यास केल्यास आपल्या राज्यातील प्रत्येक गावात सामुहिक शेतीची गरज आहे.सामुहिक शेतीमुळे शेतकऱ्यांना बळकटी येते. एकत्रित शेती केल्याने शेतीशी अनुसरून अवजारे, बी-बियाणे, खते व कीटकनाशके जास्त खरेदी केल्याने त्याच्या उत्पादन खर्चात बचत होऊ शकते. हल्ली बैलजोडीने नांगरणी फार कमी प्रमाणात केली जाते. त्याच्याऐवजी ट्रॅक्टरने नांगरणी केली जाते. म्हणजे सामूहिक शेती करीत असताना ट्रॅक्टरचा वापर केल्याने इतर खर्च कमी होतो. एकटा शेतकरी असल्याने नेहमीच त्याला पाण्याची समस्या जाणवत असते. सामूहिक शेती केल्याने ठिबक सिंचन, शेततळी, नदीला केटी बंधारा याच्या सहाय्याने पाणीपुरवठा करू शकतो. म्हणजे जल संसाधनांचा प्रभावीपणे वापर करू शकतो. एका शेतकऱ्याकडे सर्वच कौशल्य असतात असे नाही तेव्हा एकत्रित शेती केल्याने प्रत्येकाजवळ असलेल्या कौशल्याचा योग्य प्रकारे वापर करू शकतो. तसेच एकजूट असल्याने कामाची श्रमविभागणी करू शकतात. जेव्हा सामूहिक शेती केली जाते तेव्हा त्या शेतमालाला चांगला भाव येतो. उत्पादित शेतमाल सरळ बाजारपेठेत नेला जातो. त्यामुळे अधिक फायदा होतो. यामध्ये दलालांचे उच्चाटन होते. सामूहिक शेतीमुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने धान्य प्रक्रिया, मालाची प्रतवारी व किंमत ठरविणे शक्य होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतात.

# कोकणातील जैवविविधतेचे रक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी जीआयटी कॉलेजचा ऐतिहासिक पुढाकार



देवराई, धनेश पक्षी संवर्धन आणि वृक्ष वाचनालय प्रकल्पांचा जुलैमध्ये शुभारंभ कोकणचा निसर्ग हा समृद्ध जैवविविधतेने नटलेला आहे, परंतु वाढते शहरीकरण आणि हवामान बदलामुळे येथील अनेक दुर्मिळ वनस्पती व प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हीच गंभीर बाब ओळखून पर्यावरण समतोल राखणे, दुर्मिळ वनस्पती प्रजातींचे जतन करणे आणि अन्नसाखळीचे संरक्षण करणे या उद्देशाने कोकणामध्ये एक अत्यंत महत्त्वाचा आणि पथदर्शी उपक्रम साकारला जात आहे. घरडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (जीआयटी), लवेल, चिपळूण कॉलेजच्या विस्तीर्ण कॅम्पस परिसरात जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तीन महत्त्वाकांक्षी आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांची सुरुवात होणार आहे. यामध्ये देवराई प्रकल्प , धनेश पक्षी संवर्धन प्रकल्प आणि वृक्ष वाचनालय प्रकल्प यांचा समावेश आहे. या प्रकल्पांची अधिकृत माहिती जीआयटी प्रकल्प अधिकारी व कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. नितीन कोळेकर यांनी दिली आहे. या पर्यावरणपूरक महाप्रकल्पांसाठी जीआयटी कॉलेज, सह्याद्री संकल्प सोसायटी , देवरुख आणि वन विभाग, चिपळूण यांनी एकत्र येत एक महत्त्वपूर्ण त्रिपक्षीय भागीदारी केली आहे. हा उपक्रम कोकणातील विस्कळीत होत चाललेल्या अन्नसाखळीला बळकट करण्यासाठी आणि येथील वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल.ङ्गया नाविन्यपूर्ण आणि व्यापक प्रकल्पांसाठी जीआयटी कॉलेजच्या परिसरातील तब्बल ३ एकर इतकी विस्तीर्ण जागा राखीव ठेवण्यात आली आहे. या ३ एकर क्षेत्रावर अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने निसर्गाचे एक जिवंत संग्रहालय उभे केले जाणार आहे. डॉ. नितीन कोळेकर यांनी नमूद केल्याप्रमाणे, या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये केवळ झाडे लावून ती सोडून दिली जाणार नाहीत, तर प्रकल्पाच्या दीर्घकालीन यशासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा थेट सहभाग सुनिश्चित करण्यात आला आहे. यासाठी कॉलेज प्रशासनाने वृक्ष दत्तक योजना लागू केली आहे. या धोरणांतर्गत कॉलेजमधील प्रत्येक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी एक वृक्ष दत्तक घेतील. दत्तक घेतलेल्या झाडाच्या वाढीची, त्याला पाणी घालण्याची आणि त्याच्या संरक्षणाची पूर्ण जिम्मेदारी संबंधित शिक्षक किंवा विद्यार्थ्याची असेल, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाप्रती संवेदनशीलता आणि उत्तरदायित्वाची भावना निर्माण होईल.ङ्गया भव्य प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ५५० हून अधिक वृक्षांची लागवड केली जाणार आहे. हे केवळ साधे वृक्षारोपण नसून, यात कोकण आणि पश्चिम घाटातील ५० हून अधिक स्थानिक आणि दुर्मिळ वृक्ष प्रजातींचा समावेश असणार आहे. नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण ५० हून अधिक प्रजातींच्या ५५० रोपांची उपलब्धता सह्याद्री संकल्प सोसायटी ही सामाजिक संस्था आणि वन विभाग, चिपळूण यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली आहे. या वनस्पतींमुळे स्थानिक कीटक, पक्षी आणि लहान प्राण्यांना नैसर्गिक अधिवास मिळून संपूर्ण अन्नसाखळी मजबूत होण्यास मोठी मदत होणार आहे.ङ्गया संपूर्ण प्रकल्पांतर्गत उभारल्या जाणाऱ्या देवराई प्रकल्पामुळे आधुनिक विज्ञानाच्या मदतीने घनदाट पारंपरिक जंगलाची निर्मिती केली जाईल. दुसरीकडे, धनेश () पक्षी संवर्धन प्रकल्पाच्या माध्यमातून जंगलाचा शेतकरी समजल्या जाणाऱ्या धनेश पक्षांसाठी आवडती फळझाडे लावून त्यांचा अधिवास पुनर्संचयित केला जाईल. तसेच, तंत्रज्ञानाची जोड देऊन उभारण्यात येणाऱ्या वृक्ष वाचनालय प्रकल्पात प्रत्येक झाडाला क्यूआर कोड दिला जाईल, जो स्कॅन करताच झाडाची संपूर्ण वैज्ञानिक व औषधी माहिती विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर उपलब्ध होईल. हे वृक्ष वाचनालय वनस्पतीशास्त्र आणि पर्यावरण विज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे एक उत्तम केंद्र ठरेल.ङ्गया पर्यावरणपूरक चळवळीला प्रत्यक्ष रूप दिल्याबद्दल आणि मोलाचे योगदान दिल्याबद्दल जीआयटी कॉलेज प्रशासनाने सह्याद्री संकल्प सोसायटीचे संचालक प्रतीक मोरे यांचे विशेष आभार मानले आहेत. प्रतीक मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने दुर्मिळ रोपांची निवड आणि तांत्रिक आराखडा तयार करण्यात मोठी भूमिका बजावली आहे. यासोबतच, चिपळूण वन विभागाच्या सर्व वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांचेही कॉलेजतर्फे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या शासकीय पाठबळामुळे, मौल्यवान मार्गदर्शनामुळे आणि वनविभागाच्या रोपवाटिकेतून दुर्मिळ स्थानिक प्रजातींची रोपे उपलब्ध करून दिल्यामुळेच हा ३ एकरांचा प्रकल्प जुलैमध्ये सुरू होत आहे. याप्रसंगी जीआयटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी सर्व सहकाऱ्यांचे व दोन्ही सहयोगी संस्थांचे () विशेष आभार मानले असून ही सामूहिक युती संपूर्ण महाराष्ट्रासाठी निसर्ग संवर्धनाचा एक नवा आणि आदर्श वस्तुपाठ ठरेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# स्मार्ट मीटरवर नागरिकांचा अविश्वास; “आमचे मीटर बदलून द्या!” कार्यकारी अभियंत्याकडे वीजग्राहकांची मागणी

प्रतिनिधी भूषण सिसोदे

स्मार्ट मीटर बसविल्यानंतर प्रचंड वीजबिल वाढले असल्याने जुने माणगांवमधील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत महावितरणच्या कार्यकारी अभियंता प्रदीप डाळू यांची भेट घेतली. यावेळी नागरिकांनी ‘‘स्मार्ट मीटरवर आमचा विश्वास नाही, आमचे नवीन मीटर बदलून, पुन्हा जुने मीटर बसवून द्या,’’ अशी ठाम मागणी केली.ङ्ङमहावितरणकडून स्मार्ट मीटरबाबत पुरेशी जनजागृती करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला. परिसरात दोन लाखांहून अधिक वीज ग्राहक असताना केवळ दहा हजार ग्राहकांपर्यंतच माहितीपत्रके (हँडबील) पोहोचविण्यात आल्याचे कार्यकारी अभियंता डाळू यांचे बोलण्यातून निदर्शनास येताच नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. उर्वरित ग्राहकांना स्मार्ट मीटरची माहिती का देण्यात आली नाही, असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.ङ्ङस्मार्ट मीटरमुळे वीजबिलांमध्ये वाढ झाली आहे. ग्राहकांना आर्थिक भुर्दंड पडत असून आहे. आमचे मीटर बदला नाहीतर हे मीटर योग्य आहेत याची खात्री करून द्यावी. अशा विविध प्रश्नांची समाधानकारक उत्तरे अद्याप मिळालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे शंकानिरसन केल्याशिवाय लाईट बिल भरणार नाही, अशी भूमिका नागरिकांनी मांडली.ङ्ङयावेळी कार्यकारी अभियंता प्रदीप डाळू यांनी नागरिकांच्या शंका व तक्रारी ऐकून घेतल्या. स्मार्ट मीटरबाबत अधिक माहिती व जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात येईल तसेच नागरिकांच्या सूचनांचा विचार केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या बैठकीला जुन्या माणगांव परिसरातील मोठ्या संख्येने वीज ग्राहक व नागरिक उपस्थित होते. स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावरून नागरिकांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता आणि महावितरणच्या जनजागृतीबाबतचे प्रश्न यामुळे हा विषय चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे.ङ्गवारंवार खंडित होणारा वीजपुरवठा तसेच स्मार्ट मीटर बसविल्यानंतर प्रचंड वीजबिल वाढले असल्याने जुने माणगांवमधील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत महावितरण कार्यकारी अभियंता प्रदीप डाळू यांची माणगांव विश्रामगृह येथे भेट घेतली. नागरिकांचे शंका निरसन न झाल्याने ‘‘स्मार्ट मीटरवर आमचा विश्वास नाही, आमचे नवीन मीटर बदलून, पुन्हा जुने मीटर बसवून द्या,’’ अशी त्यांनी मागणी केली.





## तमनाथ विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी बंडू तुरडे यांची बिनविरोध निवड

कर्जत (जयेश जाधव)

१९५३ पासून शेतकऱ्यांच्या सेवेत असलेल्या कर्जत तमनाथ विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी बंडू तुरडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ङ्ग बंडू तुरडे यांच्या निवडीने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी कार्यरत असलेल्या कर्जत तमनाथ विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित सहकार संस्थेचे अध्यक्ष पदाची निवडणूक झाली. माजी अध्यक्ष परशुराम घारे यांनी आपल्या राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. संस्थेच्या १३ सदस्यीय संचालक मंडळातून अध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्यात आली. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात अध्यासी अधिकारी शिवाजी घुले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.ङ्ग



अध्यक्षपदासाठी बंडू तुरडे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष बंडू तुरडे यांनी शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करण्याची ग्वाही दिली. पीक कर्ज, शासकीय योजना आणि सहकार क्षेत्रातील सेवा अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यां पर्यंत पोहोचविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी माजी अध्यक्ष परशुराम घारे, तसेच मधुकर घारे, यांच्यासह संचालक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## कर्जतमधील वकील कैलास मोरे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

कर्जत (जयेश जाधव)

कर्जत शहरातील जुन्या कचेरी टेकडीचे पर्यावरणपूरक सुशोभीकरण करून नागरिकांसाठी निसर्गरम्य उद्यान विकसित करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. कैलास मोरे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात केली. दरवर्षीप्रमाणे यंदाही वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करत त्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.ङ्गङ्ग१२ जून रोजी जुन्या कचेरी टेकडी परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बोलताना ॲड. मोरे यांनी नगरपरिषद प्रशासनाने या टेकडीचा विकास आराखडा तयार करून येथे नाना-नानी पार्क, लहान मुलांसाठी खेळणी, ओपन जिम, अभ्यासिका, नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅक तसेच हिरवळ जपणारे पर्यावरणीय उद्यान विकसित करावे, अशी मागणी केली. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून हा परिसर शहरातील आकर्षणाचे केंद्र बनविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.ङ्गङ्गकार्यक्रमाला कर्जत नगर परिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक महेंद्र चंदन यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.ङ्गदरम्यान, वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत श्रद्धा फाउंडेशन संस्थेतील निराधार मनोरुग्णांना फळवाटप करण्यात आल्याने वाढदिवसाला समाजसेवेची अर्थपूर्ण जोड मिळाली.



## मनसेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन

कर्जत (जयेश जाधव)

महाराष्ट्र नव निर्माण सेना व अ पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली संघटनेच्या विद्यमानाने महाराष्ट्र नव निर्माण सेनेचे पक्ष प्रमुख राज साहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून कर्जत तालुक्यातील माथेरानच्या पायथ्याशी बेकरेवाडी येथे महा आरोग्य शिबिराचे आयोजित करण्यात आले होते.ङ्ग या कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र नव निर्माण रेल्वे सेनेचे अध्यक्ष श्री जितेंद्रभाई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांना पुष्प हार घालून पूजन करण्यात आले. तसेच अध्यक्षांच्या हस्ते वृक्ष रोपण करण्यात आले त्या नंतर मान्यवर, डॉक्टर, ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत मान्यवरांचे डॉक्टरांचे स्वागत करण्यात आले.ङ्गमहा आरोग्य तपासणी कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या शिबिरात बीपी शुगर कॉलेस्ट्रॉल रक्ताच्या चाचण्या सामान्य चाचण्या डोळे तपासणी व अल्प दरात चष्मे वाटप, तसेच रक्तदान शिबिर आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते ङ्गया कार्यक्रमात संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ ज्ञानेश्वर साळोखे यांनी देखील जितेंद्र पाटील यांनी पक्षात केलेल्या कार्याचा गौरव केला आणि आता आपण कर्जत खालापूर तालुक्यातील तळागाळातील नागरिकांसाठी सामान्य नागरिकांन साठी काम करावे असे मत व्यक्त करून ङ्गराज साहेबांना व मनसे रेल्वे कामगार सेना अध्यक्ष जितेंद्र पाटील यांना शुभेच्छा दिल्या.ङ्गङ्ग जितेंद्र पाटील यांनी पक्ष जबाबदारी गेली दहा वर्ष निस्वार्थीपणे केलेले कार्य वाखण्याजोग आहे. तसेच सन्माननीय राज साहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नागरिकांना आरोग्य शिबिरात नागरिकांना याचा लाभ मिळावा या उद्देशाने या साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच आपले मत व्यक्त करताना साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या या वेळी या कार्यक्रमास ङ्गमहाराष्ट्र नव निर्माण कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, पोलिस मित्र सुरक्षा परिषद संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री डॉ ज्ञानेश्वर साळोखे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री किशोर शितोळे, प्रवक्ते गणेश कालन, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष डॉ विशाल बनसोडे,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जैतू बुवा कराळे, राष्ट्रवादी शरद पवार गट प्रदेश संघटक विजय मोहिते, रायगड भूषण किशोर गायकवाड, पत्रकार जयेशजी जाधव,महेश राजगुरू, समाधान पाटील रायगड हॉस्पिटल डॉ दिव्या मॅडम, डॉ मयुरी मोहिते, नामदेव निरगुडा, रमेश पारधी, गजानन पारधी, बुधाजी पारधी, जयंद्र निरगुडा,राजेश निरगुडा, इत्यादी उपस्थित होते





# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

साखरेची निर्यातबंदी उद्योगासाठी धोक्याची

महाराष्ट्र हे साखरेच्या उत्पादनात अग्रेसर असलेले राज्य आहे. आपल्याकडील उसाच्या पिकाचे एकूण क्षेत्रफळ लक्षात घेता दरवर्षी साखरेचे उत्पादन हे अमाप होते. २०२५-२६ मधील गळीत हंगामात साखरेच्या उत्पादनांचा अंदाज ३१० लाख टन इतका होता. त्याला अनुसरून नोव्हेंबर २०२५ मध्ये केंद्र सरकारने २० लक्ष टन साखरेच्या निर्यातीस परवानगी दिली. परंतु त्यानंतर अचानक साखरनिर्यातीवर बंदी आणल्याने हा उद्योग धोक्यात आला आहे. याच अनुषन्गाने छत्रपती शाहू सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक जितेंद्र चव्हाण यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१ देशातील साखरेच्या एकूण उत्पादनाचे गणित नेमके कसे आहे?

देशातील साखरेच्या एकूण उत्पादनापैकी फक्त २५ ते ३० टक्के साखर घरगुती वापरासाठी जाते,तर उर्वरित ७० ते ७५ टक्के साखर व्यापार आणि उद्योग क्षेत्रात वापरली जाते. मिठाई उद्योगासारखे व्यापारी घटक साखर ४० रुपये प्रति किलो दराने खरेदी करून त्यापासून बनणारी उत्पादने ४०० रुपये किलो इतक्या चढ्या दराने विकतात. त्यामुळे साखरेपासून मिळणार नफा हा इतर उद्योगांना मिळतो. मात्र साखर कारखान्यांना त्याचा फायदा होत नाही. त्यामुळे साखरेचे दर हे घरगुती आणि औद्योगिक वापरासाठी द्विस्तरारीय पद्धतीने निश्चित करणे गरजेचे आहे.

२ केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंदी आणल्याचा उद्योगांना कसा फटका बसला आहे?

केंद्र सरकारने प्रथम साखरेच्या निर्यातीला परवानगी दिली. त्यासाठी कोटा ठरवून दिला. त्यानुसार साखर कारखान्यांनी निर्यातीसाठी नियोजन करून व्यापाऱ्यांशी करार केले आणि मागणीनुसार साखर पोत्यामध्ये भरून ठेवली. मात्र आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक आयात निर्यात ठप्प झाल्याने केवळ ७ ते ८ लाख टन इतकीच साखर निर्यात होऊ शकली आहे. दरम्यान देशातील सर्वच साखर कारखान्यांचे हंगाम संपुष्टात येऊन एकूण २८५ टन साखरेचे उत्पादन झाले. दरम्यान देशांतर्गत साखरेचे भाव वाढू नयेत म्हणून सरकारने साखरेच्या निर्यातीवर बंदी आणल्याने आणि साखरेच्या किमान विक्रीला वाढ मिळावी याच्या प्रतीक्षेत असलेला हा उद्योग धोक्यात आलेला आहे.

३साखरेच्या किमान विक्री मूल्यास वाढ मिळायला हवी त्याबद्दल काय सांगाल?

ज्या पद्धतीने एफआरपी निश्चित करताना शेतातील सर्व खर्च विचारात घेतला जातो,त्याच प्रमाणे उसाचा एफआरपी हा साखरेच्या किमान विक्री मुल्याशी जोडण्यात यावा.यामुळे ऊस खरेदी खर्च,प्रक्रिया खर्च आणि विक्री उत्पन्न यामध्ये समतोल साधता येईल. इथेनॉल चा दर उसाच्या विक्री दराशी निगडित करावाआणि इथेनॉल पुरवठ्यामध्ये साखर कारखाने आणि धान्याधारित इथेनॉल प्रकल्प याना समान कोटा मिळावा अशी सुस उत्पादक शेतकऱ्यांची मागणी आहे.



२गम्मत जम्मत

रेडिओ प्रसारणासाठी किडझानिया इंडियाची बिग एफएमसोबत भागीदारी


एड्युटेनमेंटमधील (शैक्षणिक मनोरंजन) जागतिक अग्रणी असलेल्या किडझानिया इंडियाने, भारतातील सर्वात मोठ्या सिंगल ब्रँड रेडिओ नेटवर्क असलेल्या बिग एफएमसोबत भागीदारी करून, किडझानिया इंडियामध्ये बिग एफएम रेडिओ स्टेशन सुरू केले आहे. हा नवीन उपक्रम मुलांना रेडिओच्या जगात प्रवेश करण्याची संधी देतो, जिथे ते रेडिओ जॉकीची भूमिका साकारू शकतात, प्रसारणाची मूलतत्त्वे जाणून घेऊ शकतात आणि एका गतिमान स्टुडिओच्या वातावरणात माइकच्या मागे बोलण्याचा थरार अनुभवू शकतात.एक आकर्षक, वास्तविक जगासारखा भूमिका साकारण्याचा अनुभव म्हणून डिझाइन केलेले, बिग एफएम रेडिओ स्टेशन लहान मुलांसाठी तयार केलेल्या स्वरूपात, त्यांना माध्यमांच्या सर्जनशील आणि संवादात्मक बाजूची ओळख करून देते. मार्गदर्शित संवादाद्वारे, मुले एका अविस्मरणीय पद्धतीने मनोरंजन आणि शिक्षण एकत्र आणणाऱ्या उपक्रमात सहभागी होताना, आवाजाचे सादरीकरण, आत्मविश्वास वाढवणे, स्पष्ट उच्चार आणि प्रेक्षकांशी संवाद साधणे यांसारख्या गोष्टी शिकू शकतात.

३ नोंद

कला भारतीचा महिला सशक्तिकरण कार्यक्रम संपन्न

राष्ट्रसेवेच्या भावने प्रेरित होऊन कला भारती असोसिएशनच्या सदस्याचा श्री. अभिषेक कोलीचा भारतीय जनता पक्षात औपचारिक प्रवेश संपन्न झाला. याच संकल्पासह मुंबईत महिला सशक्तिकरण, आत्मनिर्भरता व समग्र विकासाला समर्पित विशेष कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचा मुख्य उद्देश राष्ट्रीय सेवा करणे आणि महिलांना आर्थिक, सामाजिक व आरोग्य क्षेत्रात सक्षम करणे हा होता. महिलांना आर्थिक साक्षरता, पोर्टल, मुद्रा योजना, स्वयंरोजगार संधी, उद्योजकता विकास तसेच आरोग्य व पोषण यावर सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले.या कार्यक्रमाला .महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री मा. श्री. आशिष शेलार, विधान परिषद सदस्य श्रीमती उमा खापरे, मुंबई भाजप महिला मोर्चा अध्यक्षा श्रीमती योजना ठोकळे, एमएलसी श्रीमती माधवी नाईक, भाजप महामंत्री व इतर मान्यवर उपस्थित होते. कला भारती असोसिएशनच्या संस्थापक व अध्यक्षा श्रीमती उषा बाजपेयी यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेविका श्रीमती स्वप्ना म्हात्रे यांनी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

श्रीमती उषा बाजपेयी म्हणाल्या की हा कार्यक्रम महिलांना आत्मनिर्भर व सक्षम बनवण्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल होता. महिला विकसित भारताच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. प्रत्येक महिलेला संधी, मार्गदर्शन व व्यासपीठ देणे हे आपले कर्तव्य आहे. महिला शक्ती व आत्मनिर्भर भारताचा संकल्प साकार करण्याच्या दिशेने हा कार्यक्रम महत्त्वाचे पाऊल ठरला.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क -९८३३१४६३५६**
**इमेल -**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक
सूर्योदय
रविवार १४ जून २०२६ 

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# दुधात भेसळ करणा-यांची गय करणार नाही



मुंबई : प्रतिबंधित गुटखा, पानमसाला याबरोबरच खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणा-यांविरोधात अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी धडक मोहीम हाती घेतली आहे. दुधात भेसळ करणा-यांची यापुढे गय केली जाणार नाही, असा सज्जड दम त्यांनी दिला आहे. त्यामुळे दुधात भेसळ करणा-यांचे धाबे दणाणले आहे.

मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुधात भेसळ केली जाते. दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून वारंवार कारवाई करूनही दूध भेसळीला आळा घालण्यात अन्न व औषध प्रशासनाला फारसे यश येत नाही. अन्न व औषध प्रशासनाचा पदभार स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी बनावट औषधे, गुटखा, पानमसाला आणि खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणा-यांविरोधात जोरदार मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत अवघ्या १५ दिवसांत कोट्यवधींचा माल जप्त करून जवळपास २५० हून अधिक व्यक्तींवर कारवाई करून त्यांना अटक केली आहे.

डेअरी चालकांना इशारा

बनावट औषधे, गुटखा, पानमसाला आणि खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणा-यांपाठोपाठ आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा दूध उत्पादक, वितरक आणि डेअरी चालकांकडे वळवला आहे. तुकाराम मुंढे यांनी शुक्रवारी मुंबईतील एफडीए मुख्यालयात महाराष्ट्रातील प्रमुख डेअरी चालकांची तातडीची बैठक घेतली. या बैठकीत दुधात पाणी किंवा इतर घातक पदार्थांची भेसळ अजिबात सहन केली जाणार नाही, असे मुंढे यांनी डेअरी चालकांना सुनावले.ग्राहकापर्यंत दुधाचा प्रवास सुरक्षित करा दुधात पाणी किंवा रासायनिक भेसळ करणा-यांनाच नव्हे, तर 'अस्वच्छ पद्धती' आणि चुकीच्या हाताळणीमुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणा-यांवरही कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. उत्पादकापासून ते अंतिम ग्राहकापर्यंत दुधाचा प्रवास संपूर्णपणे सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार असावा, अशा सक्त सूचना त्यांनी डेअरी चालकांना दिल्या. यामुळे दूध भेसळ करणा-यांचे धाबे दणाणले आहे.

तक्रार नोंदणीसाठी टोल-फ्री क्रमांक

अन्नपदार्थाच्या दर्जाबाबत तक्रारीसाठी केंद्र सरकारच्या ॲपची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या नवीन ॲपवर नागरिकांना तक्रार नोंदविता येणार आहे. तसेच तक्रारीसाठी नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ यावर संपर्क साधावा, असे आवाहन तुकाराम मुंढे यांनी केले आहे.

## अफकॉन्सच्या सीएसआर उपक्रमामुळे ९४ कर्करोगग्रस्त बालक व पालकांच्या जीवनात नवी उमेद – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, : अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वातून (सीएसआर) बालरुग्णांसाठी कर्करोग निदान सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे ९४ बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या जीवनात नवी उमेद जागविण्याचे प्रेरणादायी काम झाले आहे,अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सुविधेचे कौतुक केले आहे.



अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने २०२५-२६ मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सीएसआरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य असले तरी आरोग्य क्षेत्रातही महत्वाचे काम केले आहे. देशभरातील कर्करोगाचा संशय असलेल्या बालरुग्णांसाठी तातडीची निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाअंतर्गत अफकॉन्सने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून ''कर्करोगाचा संशयित आजार असलेल्या बालरुग्णांसाठी आपत्कालीन निदान सहाय्य सेवा'' या योजनेसाठी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे.

या सहाय्यामुळे देशभरातील ९४ बालकांना कर्करोगाचे तातडीने निदान आणि आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊ शकल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कर्करोगासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे असते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत अफकॉन्सने दिलेली मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून अनेक बालकांच्या उपचार प्रक्रियेला गती देणारी आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारी ठरली आहे. शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राची अशी साथ मिळाल्यास आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे अधिक वेगाने साध्य होऊ शकतात. म्हणूनच समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होणे आवश्यक आहे.कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे नमूद करुन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अफकॉन्सने शिक्षण क्षेत्राबरोबरच महिला सक्षमीकरण आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये केलेली गुंतवणूक ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समाजातील गरजू घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सीएसआर उपक्रमांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते.

## वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या केळी पिकासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात – सचिन हाके

बारामती, : सध्या खरीप हंगामपूर्व झालेल्या गारपीट, अतिवृष्टी आणि वादळी वाऱ्यांमुळे अनेक ठिकाणी केळी पिकाचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी केळीची झाडे पडली असून काही ठिकाणी खोड तुटल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी तातडीने योग्य उपाययोजना कराव्यात, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे.ङ्ङवादळी वाऱ्यामुळे पडलेली किंवा कललेली केळीची झाडे २४ ते ४८ तासांच्या आत सरळ करून त्यांना बांबू किंवा मजबूत काठ्यांच्या सहाय्याने आधार द्यावा. वाढीच्या अवस्थेतील झाड पूर्णपणे तुटले असल्यास ते काढून टाकून निरोगी तलवार छाट करून खोडवा राखावा. घडधारणेच्या अवस्थेतील झाडांना विशेष काळजी घेऊन आधार द्यावा तसेच खराब, जखमी किंवा कुजलेल्या फण्या काढून टाकाव्यात.ङ्ङशेतात किंवा मुळांभोवती साचलेले पाणी तात्काळ काढून टाकावे. दीर्घकाळ पाणी साचल्यास मुळांना इजा होऊन झाडे सडण्याची शक्यता वाढते. मुळांच्या वाढीसाठी ह्युमिक ॲसिड किंवा समुद्री शेवाळ अर्काचा वापर करण्याचा सल्ला



देण्यात आला आहे.ङ्ङजखमी झालेल्या झाडांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड (३ ग्रॅम) किंवा मॅन्कोझेब (२.५ ग्रॅम) प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच जखमेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.

नुकसानग्रस्त झाडांवर अनावश्यक रासायनिक खतांचा वापर टाळावा. झाडांची स्थिती सुधारल्यानंतरच खत व्यवस्थापन करावे. अतिवृष्टीमुळे नत्र व पालाशाचे नुकसान झाल्याने पूरक खत व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पाण्यात विद्राव्य खतांची तसेच पोटॅशियम नायट्रेटची फवारणी केल्यास झाडांची पुनर्प्राप्ती जलद होण्यास मदत होते.ङ्ङशेतकऱ्यांनी आपल्या पिकांच्या नुकसानीची नोंद संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी किंवा ग्राम विकास अधिकारी यांच्याकडे करावी. पीक विमा योजनेत सहभागी असलेल्या शेतकऱ्यांनी विहित कालावधीत विमा कंपनी किंवा संबंधित यंत्रणेकडे नुकसानीची माहिती सादर करावी.ङ्ङनुकसान झालेल्या केळी पिकामध्ये घाईघाईने कोणतीही उपाययोजना न करता कृषी अधिकारी, शास्त्रज्ञ किंवा कृषी विज्ञान केंद्रांच्या मार्गदर्शनानुसार आवश्यक उपाय करावेत. यामुळे पुढील नुकसान टाळण्यास तसेच उत्पादनाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यास मदत होईल, असे श्री. हाके यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि उत्तरदायी व्हावे – अपर मुख्य सचिव विकास खारगे

नंदुरबार, (जिमाका): महसूल विभाग हा केवळ जमिनींच्या नोंदींचा विषय नसून नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण, आदिवासी व वंचित घटकांना न्याय, शासकीय जमिनींचे संवर्धन आणि विकासकामांना गती देणारी महत्त्वपूर्ण यंत्रणा आहे. नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ व्हावा, महसूल सेवा अधिक सुलभ व पारदर्शक व्हाव्यात आणि शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, यासाठी महसूल विभागाने अधिक संवेदनशीलतेने आणि उत्तरदायित्वाने कार्य करावे, असे प्रतिपादन महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी आयोजित महसूल विभागाच्या आढावा बैठकीत त्यांनी महसूल अभिलेखांचे अद्ययावतीकरण, शासकीय जमिनींचे व्यवस्थापन, अतिक्रमण निर्मूलन, स्वामित्व योजना, आदिवासी जमीन हस्तांतरण प्रकरणे, हक्क अभिलेख, जमीन बँक, भूसंपादन, तक्रार निवारण व्यवस्था, तंत्रज्ञानाचा वापर आणि ई-कार्यालय प्रणाली यासह विविध विषयांचा सविस्तर आढावा घेत महत्त्वपूर्ण निर्देश दिले.

या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, उपविभागीय अधिकारी उषाराणी देवगुणे-दहिकर, जिल्हा पुनर्वसन अधिकारी एकनाथ पाटील, उपजिल्हाधिकारी कल्पना ठुबे, प्रमोद भामरे, जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार, गौण खनिज अधिकारी रोहिणी चव्हाण उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील सर्व तहसीलदार आणि उपनिबंधक हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस सहभागी झाले होते.

महसूल अभिलेखांच्या देखभाल व गुणवत्तावृद्धीला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना देताना श्री. खारगे यांनी फेरफार, वारस नोंदी आणि इतर सर्व प्रलंबित नोंदी कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. जमिनीच्या नोंदी अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त असतील तर नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल.

शेतकरी, वारसदार किंवा सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या हक्कांच्या नोंदींसाठी वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

शासकीय जमिनी या समाजाच्या विकासासाठीची मौल्यवान संपत्ती असल्याचे सांगत त्यांनी उपलब्ध शासकीय जमिनींची ओळख, नोंदणी, संरक्षण आणि प्रभावी व्यवस्थापनावर विशेष भर दिला. शासकीय जमिनींचा योग्य व नियोजनबद्ध वापर होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांसाठी, शैक्षणिक संस्थांसाठी, आरोग्य सुविधा केंद्रांसाठी तसेच सार्वजनिक हिताच्या विविध विकास प्रकल्पांसाठी उपलब्ध शासकीय जमिनींचा वापर करण्याबाबत ठोस प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

अतिक्रमण निर्मूलन हा महसूल प्रशासनाचा महत्त्वाचा विषय असल्याचे नमूद करत त्यांनी महसूल अभिलेख आणि प्रत्यक्ष जागेतील स्थिती यामधील तफावत दूर करण्यासाठी नियमित पडताळणी करण्याचे निर्देश दिले. शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांविरुद्ध नियमित, प्रभावी आणि कालबद्ध कारवाई करून सार्वजनिक मालमत्तांचे संरक्षण करावे. विकास कामांसाठी आवश्यक जमीन उपलब्ध राहणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी सार्वजनिक संसाधने सुरक्षित ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व विशेष अभियानांसाठी स्पष्ट कालमर्यादा निश्चित करण्याच्या सूचना देताना त्यांनी प्रत्येक उपक्रमासाठी निश्चित उद्दिष्टे आणि वेळापत्रक ठरविण्याचे निर्देश दिले. निर्धारित कालावधीत उद्दिष्टपूर्ती होण्यासाठी नियमित आढावा, पाठपुरावा आणि जबाबदारी निश्चितीची प्रभावी यंत्रणा उभारण्यावर त्यांनी भर दिला. जमीन बँक उपक्रमांतर्गत उपलब्ध जमिनींची प्रत्यक्ष पडताळणी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. जमिनींची उपलब्धता,

वापरक्षमता आणि सद्यस्थिती यांची खात्री करून जमीन बँकेतील सर्व माहिती अद्ययावत ठेवावी. भविष्यातील विकास प्रकल्प, उद्योग, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक हिताच्या योजनांसाठी योग्य जमीन उपलब्ध करून देण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्वामित्व योजनेअंतर्गत प्रलंबित असलेली सर्व कामे निश्चित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या मालमत्तेचा अधिकृत हक्क प्राप्त होण्यासाठी या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )